आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३० जानेवारी २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी उद्या बैठक

- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७८व्या पुण्यतिथीनिमित्त देशभरातून आदरांजली

- चांदीच्या दरात तब्बल ४० हजार तर सोन्याच्या दरात साडे ९ हजार रुपयांची घसरण

- राष्ट्रीय शेअर बाजाराच्या IPO ला सेबीकडून ना हरकत प्रमाणपत्र

**आणि**

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या विजेतेपदासाठी कार्लोस अल्काराझ आणि नोवाक जोकोविच यांच्यात येत्या रविवारी अंतिम लढत

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसनं विधिमंडळ पक्षाची उद्या बैठक बोलावली आहे. त्यात विधीमंडळ पक्षनेत्याची निवड होईल अशी माहिती पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितलं. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

**होल्ड - भुजबळ बाइट**

उद्या विधिमंडळ पक्ष नेता निवडीचा निर्णय झाला तर तातडीनं शपथविधी होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर उपमुख्यमंत्रीपद तसंच त्यांच्याकडे असलेली खाती कुणाकडे सोपवली जाणार, याबाबत सुरु असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जात आहे. याबाबत पक्षाच्या सर्व आमदारांना बोलवून त्यांच्याशी चर्चा करून, जनभावनेचा आदर करून आम्हाला निर्णय

घ्यायचा आहे, ते लवकरच घेऊ, हे आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितलं, अशी माहिती प्रफुल्ल पटेल यांनी दिली.

**होल्ड - प्रफुल्ल पटेल**

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचं विलिनीकरण व्हावं अशी अजित पवार यांची इच्छा होती. यासंदर्भात नजिकच्या काळात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासोबत अनेक वेळ चर्चा केली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळं ही घोषणा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती माजी मंत्री अनिल देशमुख यांनी आज दिली.

**होल्ड - अनिल देशमुख**

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास सीआयडी अर्थात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात आला आहे. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली होती.

**<><><><><>**

येत्या १६ ते २० फेब्रुवारीदरम्यान नवी दिल्ली इथं होणारी India-AI Impact Summit 2026 ही जगातली सर्वात मोठी कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषद ठरेल, असा विश्वास केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला आहे. ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. या शिखर परिषदेत १०० पेक्षा जास्त कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सहभागी होत आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७८व्या पुण्यतिथीनिमित्त आणि शहीद दिनानिमित्त देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात आली. यानिमित्त देशभरात विविध ठिकाणी अभिवादनाचे कार्यक्रम झाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी नवी दिल्लीत राजघाट इथं महात्माजींच्या समाधीस्थळी जाऊन आदरांजली अर्पण केली.

महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त नवी दिल्लीत संध्याकाळी झालेल्या सर्व धर्म प्रार्थना सभेत उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित होते. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेचा मुख्य आधार असलेल्या स्वदेशीच्या विचारावर गांधीजींनी नेहमीच भर दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भाषा, धर्म, जात या आधारावर विभागलेल्या भारताला बापूजींनी एका सूत्रात बांधलं, असं केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी राजघाटावर जाऊन महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनीही महात्मा गांधींना आदरांजली वाहिली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राष्ट्रपित्याला अभिवादन केलं. मुंबईत विधानभवन इथल्या गांधीजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

देशभरात सकाळी १० वाजून ५८ मिनिटांनी दोन मिनिटं शांतता पाळून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

<><><><><>

प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर झालेल्या संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथानं मिळवलेला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार आज नवी दिल्लीत केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय शेठ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

राज्याची संस्कृती आणि परंपरांचं दिमाखदार दर्शन घडवणारा हा चित्ररथ 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित होता. या चित्ररथाचा विषय केवळ धार्मिक नसून तो आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणावर आधारित होता. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवातून झालेली समाजजागृती, तसंच पर्यावरणपूरक मूर्तींच्या माध्यमातून निर्माण होणारी नवी अर्थव्यवस्था या चित्ररथात प्रभावीपणे दाखवण्यात आली होती. या स्पर्धेत जम्मू-काश्मीरच्या चित्ररथाला द्वितीय, तर केरळच्या चित्ररथाला तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

<><><><><>

देशात आज सोनं आणि चांदीच्या दरात विक्रमी घसरण दिसून आली. चांदीचे दर एकाच दिवसात किलोमागे तब्बल ४० हजार ६०० रुपयांनी घसरले. त्यामुळे मुंबईच्या सराफा बाजारात एक किलो चांदीसाठी ३ लाख ४९ हजार ५०० रुपयांहून अधिक रक्कम मोजावी लागत होती.

सोन्याच्या किंमतीही आज सुमारे साडे ९ हजार रुपयांनी घसरल्या. त्यामुळं १ तोळा २४ कॅरेट सोन्याच्या किंमती १ लाख ७० हजार ७०० तर १ तोळा २२ कॅरेट सोन्याच्या किंमती १ लाख ६६ हजार ६०० रुपयांच्या पलीकडे गेल्या होत्या.

कमोडिटी बाजारांमध्ये ही घसरण यापेक्षाही अधिक होती. मोठ्या प्रमाणात झालेली नफेखोरी यामुळं या किंमतीत घसरण झाली. याशिवाय फेडरल रिझर्व्हच्या अध्यक्षपदी केविन वॉर्श यांच्या नावाची घोषणा होणार आहे. डॉलर मजबूत

करण्यासाठी ते आणखी आक्रमक भूमिका घेतील आणि त्याचा दबाव सोन्या चांदीवर येईल या कारणानं ही घसरण झाल्याचं विश्लेषकांचं मत आहे.

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज २९७ अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार २७० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ९८ अंकांची घसरण नोंदवून २५ हजार ३२१ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

सेबीनं राष्ट्रीय शेअर बाजार NSE ला IPO अर्थात प्राथमिक समभाग विक्रीसाठी ना हरकत प्रमाणपत्र आज दिलं. आता काही महिन्यातच NSE मुंबई शेअर बाजारातून भांडवल उभारेल. २०१६ मध्ये NSE नं १० हजार कोटी रुपये बाजार भांडवल उभे करण्यासाठी अर्ज केला होता. पण प्रशासनातल्या अनियमितता, माजी अध्यक्ष चित्रा रामकृष्णन यांनी काही शेअर दलालांना भौगोलिक आधारावर समभागांच्या किंमती लवकर पुरवल्याचे आरोप यासारख्या गोष्टींमुळं हा आयपीओ रखडला होता. या प्रकरणात तोडगा काढण्यासाठी NSE नं गेल्यावर्षी १ हजार ३८८ कोटी रुपये भरले होते.

<><><><><>

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीचा अंतिम सामना येत्या रविवारी जागतिक क्रमवारीत अव्वल असलेला स्पेनचा कार्लोस अल्काराझ आणि सर्बियाचा नोवाक जोकोविच यांच्यात होणार आहे. आज झालेल्या उपांत्य सामन्यात अल्काराज यानं जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव याचा पराभव केला, तर जोकोविच यानं गतविजेत्या यानिस सिनरवर मात केली.

महिला एकेरी प्रकारात उद्या होणाऱ्या सामन्यात एलेना रिबाकीना हिची लढत अरिना साबालेंका हिच्याशी होणार आहे.

<><><><><>

महिला प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत आज वडोदरा इथं मुंबई इंडियन्स आणि गुजरात जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. गुजरात जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात जायंट्सच्या ९ षटकात १ बाद ६३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्वच्या अध्यक्षपदासाठी केविन वॉर्श यांचं नामनिर्देशन करणार असल्याचं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जाहीर केलं. फेडरल रिझर्वचे विद्यमान अध्यक्ष जेरोम पॉवेल यांचा कार्यकाळ येत्या मे मधे संपणार आहे. वॉर्श सध्या स्टॅनफोर्ड ग्रॅज्युएट स्कूलमधे अध्यापक आहेत. २००६ ते २०११ या कालावधीत यांनी फेडरल रिझर्वच्या गव्हर्नरमंडळावर काम केलं आहे. फेडरल रिझर्वच्या अध्यक्षपदी त्यांच्या नेमणुकीसाठी सिनेटचं शिक्कामोर्तब आवश्यक आहे.

**//<><><><><>//**